## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**क्रमांक-मनप-२००७/प्र.क्र.१८/का-५**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ७ एप्रिल, २००७.**

### आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रमाच्या कालावधीत विविध राजकीय पक्ष, आघाडया व निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्याकडून आचारसंहितेची अंमलबजावणी योग्य रितीने करण्यात येते की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित क्षेत्रामध्ये निवडणूकविषयक कार्यवाहीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. अशा व्हिडिओ चित्रीकरणाच्या चित्रफितीची तपासणी किंवा चित्रफितीच्या प्रमाणित प्रतीची मागणी संबंधित उमेदवारांकडून अनेकदा होत असते. अशा मागणीसंदर्भात व्हिडिओ चित्रफितीची (सीडी) तपासणी करणे अर्जदारांना उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत :-

(१) संबंधित व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी लेखी अर्ज करण्यात यावा. अर्जामध्ये, ज्या निवडणुकीसंबंधी सीडी पहावयाची असेल त्या निवडणुकीच्या दिनांकासहित संपूर्ण माहिती देण्यात यावी. पडताळणीसाठी दर तासाला रुपये २५/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. अर्ज केल्याच्या तारखेच्या लगतच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर पडताळणी करता येईल. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांत / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात चित्रफित तपासणीसाठी उपलब्ध असेल. जर चित्रफितीची तपासणी तात्काळ करावयाची असेल तर पडताळणी शुल्क दर तासाला रुपये ५०/- याप्रमाणे अदा करावे लागेल.

(२) व्हिडिओ चित्रीकरणाची प्रमाणित सीडी हवी असल्यास वरील १ येथे नमूद केल्याप्रमाणे अर्जात संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे व त्याकरिता अर्जाचे शुल्क रुपये २५०/- (एका चित्रफितीसाठी) एवढे असेल.

(३) अर्जदारास व्हिडिओ चित्रीकरणाच्या तपासणीसाठी/ चित्रीकरणाची चित्रफित मागण्यासाठी स्पष्ट व निश्चित कारण देणे आवश्यक असेल व अर्जदाराचा त्या व्हिडिओ चित्रीकरणाशी व्यक्तिश: संबंध कसा आहे, हे दाखविणे आवश्यक असेल.

(४) शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयीन कामकाजासाठी जर व्हिडिओ चित्रफित आवश्यक असेल व अर्जात तसे नमूद केले असेल तर त्याकरिता शुल्क आकारण्यात येणार नाही.

(५) व्हिडिओ चित्रीकरणातील कोणत्याही सत्यतेबाबत आयोग कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. चित्रफित (सीडी) "जसे आहे तसे" या तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(६) व्हिडिओ चित्रीफितीसाठी (सीडी) प्राप्त झालेल्या अर्जाबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सर्व संबंधित राजकीय पक्षांना आणि निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

(७) व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी किंवा प्रमाणित प्रतीसाठी करण्यात येणाऱ्या अर्जाची, माहितीच्या अधिकारान्वये करण्यात येणाऱ्या अर्जाशी सांगड घालू नये. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ अन्वये, केवळ अशी माहिती अर्जदारांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे की जी राज्य विधी मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही. परंतु, राज्य निवडणूक आयोग सांविधानिक संस्था असल्यामुळे व राज्य विधान मंडळात राज्य निवडणूक आयोगाबद्दल प्रश्न विचारले जात नाही म्हणून कामकाजासंबंधी कुठलीही माहिती राज्य विधान मंडळाला देणे आयोगावर बंधनकारक नाही. राज्य निवडणूक आयोग त्याला नियमानुसार तपासून जे योग्य वाटेल अशा एखादया प्रकरणाबाबतची/प्रकरणांबाबतची माहिती अर्जदाराला/अर्जदारांना पुरविण्यास नकार देऊ शकेल.

(८) चित्रफितीसाठी तसेच चित्रफितीच्या तपासणीसाठी देण्यात आलेली शुल्काची रक्कम त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वतःच्या संबंधित लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पी. एस. मीना)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग